# Assistant Director & Public Prosecutor

सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, यवतमाळ

प्रशासकिय भवन, रुम नं. १/७ पहिला माळा, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर यवतमाळ

E-mail :- adppyavatmal@gmail.com दुरध्वनी क्र. 07232 - 244988


जा. क्र./आस्था/ १५५/२०२१ यवतमाळ दिनांक : ०९ /०४/२०२१

प्रति,

मा. एन. आय. सी. अधिकारी
यवतमाळ

विषय - यवतमाळ जिल्हयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५(३) अन्वये विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तात्पुरत्या स्वरुपात पॅनल तयार करणेबाबत जाहिरात प्रसिध्दी.

संदर्भ - मा. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचेकडील पत्र क्र. गृहशाखा/डेस्क १२/कावि/४०६/२०२१ दि. ०७/०४/२०२१.

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सविनय सादर की, यवतमाळ जिल्हयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५(३) अन्वये अस्तितवात असलेले विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे पॅनल कायम ठेऊन १० नविन विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तात्पुरत्या स्वरुपात पॅनल तयार करुन रिक्त पदी नेमणूक देणेबाबत मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी संदर्भिय पत्रान्वये जाहिरात प्रसिध्दीस मान्यता दिलेली आहे.

सबब सदरची जाहिरात विहित नमुना सोबत आपणास पूढील प्रसिध्दीस्तव सविनय सादर.

(व्ही. एम. श्रोते)
प्र. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता
जि. यवतमाळ

सहपत्र - वरिल प्रमाणे.

महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यवतमाळ (गृह विभाग)

Email ID – rdc_yavatmal@rediffmail.com Fax No. 7232-242211 Phone 242488

जाहिरात सुचना : क्र. गृहशाखा/डेस्क १२/कावि/४०६/२०२१ दि. ०७/०४/२०२१

मा. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेशाप्रमाणे यवतमाळ जिल्हयाकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५(३) अन्वये यवतमाळ जिल्हयातील ज्या न्यायालयात नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची नेमणूक झाली नाही अशा न्यायालयातील फौजदारी प्रकरणे चालविण्याकरीता अस्तितवात असलेले पॅनेल कायम ठेऊन १० विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचे पॅनल तयार करावयाचे आहे. त्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विवरण | कालावधी |
|---|---|---|
| १. | अर्ज स्विकारण्याची तारीख | दि. २२/०४/२०२१ |
| २. | अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | दि. २९/०४/२०२१ |
| ३. | पात्र उमेदवारांची यादी www.yavatmal.nic.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | दि. ०५/०५/२०२१ |
| ४. | दस्तावेज पडताळणी | दि. १०/०५/२०२१ सकाळी १०.०० ते १२.३० वाजेपर्यंत |
| ५. | मुलाखत | दि. १७/०५/२०२१ व १८/०५/२०२१ सकाळी ११.०० पासून |
| ६. | अंतीम यादी | दि. २४/०५/२०२१ सकाळी १०.०० |

तरी इच्छुक वकीलांनी खाली दिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दि. २९/०४/२०२१ पर्यंत आपले अर्ज परीपूर्ण भरुन विहीत नमुण्यात मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय (गृह विभाग) यवतमाळ येथे कार्यालयीन वेळेत अचूक पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व वैयक्तीक तपशिलासह (बायोडाटा) संबधित दस्ताऐवजांचे छायांकीत प्रतीसह सादर करावेत.

उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

## अटि व शर्ति

१. सदरची पदे यवतमाळ जिल्हा ठिकाणी आणि तालुका स्तरावरील असलेल्या न्यायालयात प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात सरकार पक्षातर्फे केसेस चालविणे करिता प्रस्तावित आहेत.

२. सदर पदे हि फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २५(३) अन्वये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर आहेत.

३. या निवड प्रक्रियेमार्फत निवड झालेल्या उमेदवारांना या निवडीच्या आधारावर भविष्यात स्थाई शासन सेवेत समावून घेण्याचा अधिकार राहणार नाही व त्याबाबतचे कोणतेही विनंती अर्ज विचारात घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता ही नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या ठिकाणी नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक झाल्यास किंवा काम करीत असलेले न्या. बंद झाल्सास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक आपोआप रद्द करण्यात येईल. अशा प्रकारच्या नियुक्त्या पुर्वावत नियमामधील तरतुदीच्या अधीन राहुन कोणत्याही वेळी, कोणतीही पूर्वसुचना न देता संपुष्टात आणण्याचा अधिकारी शासन राखुन ठेवीत आहे. तसेच वि. स. अ. यांना यवतमाळ शहर किंवा यवतमाळ जिल्हयातील तालुका न्यायालयाच्या ठिकाणी नियुक्ती मिळाल्या ते ठिकाण बंधनकारक राहिल.

. . . २/-